खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### महाविद्यालयातील पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

प्रभात

## न्यायदानाच्या क्षेत्रात पोलिसांची भूमिका महत्त्वाची

### ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील : राजगुरू महाविद्यालयात पोलीस भरती झालेल्यांचा सत्कार



राजगुरूनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आदी मान्यवर.

**राजगुरूनगर, दि. २४ (प्रतिनिधी)** - न्यायदानाच्या क्षेत्रात पोलिसांची भूमिका महत्वाची असल्याने नव्याने पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत तटस्थपणे, सेवाभावी वृत्तीने काम करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ॲड. बुट्टे पाटील बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, अरविंद दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने पोलीस झालेले विद्यार्थी आपल्या पालकांसह उपस्थित होते. जयश्री वाडेकर, मृणाल घनवट, कोमल शिंदे, पूजा राक्षे, प्राजक्ता गोगडे, संदेश डांगले या पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने सुमारे ६० पेक्षा अधिक पोलीस विद्यार्थ्यांचा पालकांसह शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन मच्छिंद्र मुळूक यांनी तर डॉ. योगेश वाळुंज यांनी आभार मानले.

PuneDistrict, 26 May 2023, Page:013
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत

पोलिस भरती झालेल्या महाविद्यालयातील साठ विद्यार्थ्यांचा सन्मान

# न्यायदानात पोलिसांची भूमिका महत्त्वाची : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** न्यायदानाच्या क्षेत्रात पोलिसांची भूमिका महत्त्वाची असल्याने नव्याने पोलिस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत तटस्थपणे, सेवाभावी वृत्तीने काम करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या पोलिस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते. या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर होते, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, अरविंद दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने पोलिस झालेले विद्यार्थी आपल्या पालकांसह उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील पुढे म्हणाले की, सैनिक आणि पोलिस हे देशाचे आधारस्तंभ असून त्यांच्यामुळेच नागरिकांचे हक्क आणि संरक्षण होत असते. नव्याने पोलिस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत मेहनतीने यश प्राप्त केले असून सर्व विद्यार्थी कौतुकास पात्र आहेत. मदतीची भावना ठेवावी परीक्षांची तयारी करून चांगल्या पदावर जावे, असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. महाविद्यालयात पोलिस अकॅडमी सुरू करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी बोलताना विद्यार्थ्यांना आपल्या आई- वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून चाकोरीबाहेरील काम न करण्याचे आवाहन केले.

संचालक हिरामण सातकर यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, असे सांगितले. जयश्री वाडेकर, मृणाल घनवट, कोमल शिंदे, पूजा राक्षे, प्राजक्ता गोगडे, संदेश डांगले या पोलिस झालेल्या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने सुमारे ६० हून अधिक पोलिस विद्यार्थ्यांचा पालकांसह शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील कारकिर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन मच्छिंद्र मुळूक यांनी केले तर आभार डॉ. योगेश वाळुंज यांनी मानले.



**पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील व मान्यवर.**

Hello Pune Gramin
Page No. 6 May 26, 2023
Powered by: erelego.com



प्रसिद्धी विभाग (२०२३ - २०२४)

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

मे २०२३ ग्रामीण पुणे ६

# सेवाभावी वृत्तीने काम करा : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरूनगर (दै. संध्या) :

न्यायदानाच्या क्षेत्रात पोलिसांची भूमिका महत्त्वाची असल्याने नव्याने पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत तटस्थपणे, सेवाभावी वृत्तीने काम करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.



या प्रसंगी व्यासपिठावर संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर होते. कार्यक्रमासाठी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, अरविंद दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने पोलीस झालेले विद्यार्थी आपल्या पालकांसह उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील पुढे म्हणाले की सैनिक आणि पोलीस हे देशाचे आधारस्तंभ असून त्यांच्यामुळेच नागरिकांचे हक्क आणि संरक्षण होत असते. नव्याने पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत मेहनतीने यश प्राप्त केले असून सर्व विद्यार्थी कौतुकास पात्र आहेत.

गरजुंना मदतीची भावना ठेवावी आणि सेवांतर्गत परीक्षांची तयारी करून चांगल्या पदावर जावे असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. महाविद्यालयात पोलीस अॅकॅडमी सुरू करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी बोलताना, विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून चाकोरीबाहेरील काम न करण्याचे आवाहन केले.

संचालक हिरामण सातकर यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून कुटुंबाचे नाव उज्वल करावे, असे सांगितले.

याप्रसंगी जयश्री वाडेकर, मृणाल घनवट, कोमल शिंदे, पूजा राक्षे, प्राजक्ता गोगडे, संदेश डांगले या पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने सुमारे ६० हून अधिक पोलीस विद्यार्थ्यांचा पालकांसह शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार डॉ. योगेश वाळुंज यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख